**महाराष्ट्र राज्यात प्राणी कल्याण कायदयाचेसंनियंत्रण करण्यासाठी पुनर्रचीत प्राणी कल्याण मंडळाची कार्ये व उदिदष्टे**

**महाराष्ट्र शासन**
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन परिपत्रक क्र.पविआ-2013/प्र.क्र.125/पदुम-3
मंत्रालय,मुंबई-32
दिनांक: 4 डिसेंबर,2013

संदर्भ :- कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र.पविआ-२०१३/प्र.क्र.१२५/पदुम-३,दि.१३/९/२०१३

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र राज्यात प्राणी कल्याण कायदयाचे संनियंत्रण करण्यासाठी प्राणी कल्याण मंडळाची उपरोक्त संदर्भ येथील शासन निर्णयान्वये पुनर्रचना करण्यात आली आहे. सदर प्राणी कल्याण मंडळाची कार्ये व उदिदष्टे खालील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र राज्यात प्राणी कल्याण विषयक कामासाठी प्रयत्न करणे व प्राण्यांना अनावश्यक होणा-या वेदनांपासून संरक्षण देण्याकरीता, केंद्र शासनाच्या प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा, 1960 व त्याखालील वेळोवेळी नियम निर्गमित करण्यात आलेले नियम तसेच महाराष्ट्र राज्य प्राणी संरक्षण कायदा 1976 यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाला तसेच स्वयंसेवी संस्थांना मदत/ मार्गदर्शन करणे.

2) प्राण्यांच्या वाहतुकीत प्राण्यांना होणा-या वेदना किंवा त्यांच्या बंदीस्त अवस्थेत त्यांना होणा-या वेदना कमी करणेसाठी शासनाला, इतर संस्थांना उपाय सुचविणे

3) जनावरांना अयोग्य पध्दतीने वाहनामध्ये भरणे व उतरविणे, जनावरांची वाहतूक करणे, वाहनामध्ये खच्चून जनावरे भरणे, जनावरांना कत्तलीकरिता नेताना वाहतूकीत जनावरांचे जाणीवपूर्वक हाल करणे (डोळयात तिखट, मीठ, तंबाखू टाकणे, त्यांना अन्नपाणी न देणे), कत्तलगृहाजवळ कत्तलीपूर्वी जनावरांना उन्हातान्हात अन्न पाण्याशिवाय बांधून ठेवणे, अतिशय क्रूर पध्दतीने मारहाण करुन, जनावरांस कत्तलपूर्व थोडे जखमी करुन वेदनामय मृत्यू देणे इत्यादी बाबीसाठी प्राणी क्लेष प्रतिबंधक कायद्यामध्ये शिक्षेची तरतूद असल्याबाबत जनमानसांत मानसिकता निर्माण करणे.

4) जनावरांना योग्य निवारा, पाणी, वैद्यकिय उपचार इत्यादी उपलब्ध व्हावा याद्दष्टीने शासनाला तसेच इतर संस्थांना योग्य ते मार्गदर्शन करणे.

ROTA/H 2162(500-12-2013).

5) बाजारपेठेत वाहनांतून जनावरांना उतरविणे व चढविणे यासाठी स्वयंसेवी संस्था/ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून चबुतरे तयार करण्यास उत्तेजन देणे.

6) माल वाहतूकीच्या गाडयांमुळे प्राण्यांना कमीत कमी त्रास व्हावा याद्दष्टीने वाहनांच्या रचनेमध्ये सुधारणा करण्यासाठी शासनास तसेच इतर संस्थांना मार्गदर्शन करणे.

7) प्राण्यांची कत्तल करताना होणा-या प्राथमिक अनावश्यक वेदना टाळण्यासाठी कत्तलखान्याच्या रचनेमध्ये सुधारणा करण्यासाठी प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा, 1960 अंतर्गत कत्तलखाने अधिनियम 2001 मधील तरतुदींबाबत शासनास तसेच स्थानिक संस्था यांना मार्गदर्शन करणे.

8) अनावश्यक व अयोग्य जनावरांची स्थानिक संस्थाकडून विल्हेवाट लावण्यासाठी कार्यवाही केली जात असताना अशा प्राण्यांना कमीत कमी त्रास/वेदना होतील यासाठी मार्गदर्शन करणे.

9) राज्यातील पांजरपोळ, गोशाळा, सार्वजनिक सेवाभावी गोसंस्था इत्यादि संस्थांना प्राणी कल्याणविषयक योजना कार्यन्वीत करण्यासाठी, आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी शिफारस/ प्रयत्न करणे.

10) प्राणी कल्याण संस्थांना भारतीय जीव जंतू कल्याण मंडळाकडील विविध योजनेमधून अर्थसहाय्य मिळणेसाठी मदत करणे.

11) प्राणी कल्याणाचे काम करणाया संस्था स्वत:च्या नियंत्रणाखाली स्थापन करणे तसेच सेवाभावी संस्थांना/व्यक्तींना गोकल्याणचे काम करण्यासाठी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन देणे.

12) रेडिओ, टी.व्ही., न्यूजपेपर, पोस्टर, बुकलेट, सेमिनार, कार्यशाळा, पथनाटये इत्यादी प्रसार माध्यमाद्वारे प्रसिध्दी देवून प्राणी क्रूरते विरुध्द तसेच प्राण्यांवर दया करणेबाबत विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे. याकरिता शिक्षण विभाग, वन विभाग, पोलीस विभाग तसेच जिल्हा परिषद तसेच जनता यांना सतर्क करुन त्यांचे सहकार्य घेणे.

13) प्राणी वाहतूकी संबंधीचे प्राणी क्रूरता प्रतिबंधक नियम 1978 मधील नियम क्रमांक 11(1) मध्ये दर्शविलेल्या प्राणी क्रूरता प्रतिबंधक विषयक तरतूदी, तसेच नियम क्रमांक 47 मधील जनावरांच्या वाहतूकी विषयक सर्व तरतूदी सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणणे.

14) प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्याच्या तरतूदीचे उल्लंघन होऊ नये यास्तव जनतेत व्यापक प्रसिध्दी देणे.

15) मांस व चर्म विषयक उद्योगांना प्राणी क्रूरता प्रतिबंधक तरतूदींबाबत सतर्क करुन त्यांच्या मार्फत देखील जनतेत जागृती निर्माण करणे.

16) प्राणी कल्याण विषयक कामासाठी राज्यातील विविध भागात भेटी देऊन प्राणी कल्याणाच्या आवश्यकतेबाबत जनतेचे प्रबोधन करणे.

(प्रा.प्र. वसईकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मंडळाचे सर्व सदस्य (स्वतंत्र पत्राद्वारे)
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (पर्यावरण वने) यांचे सचिव, भारत सरकार, पर्यावरण भवन, लोदी रोड, नवी दिल्ली - 110 003
५. आयुक्त पशुसंवर्धन, भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि भवन, नवी दिल्ली.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला
७. सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-32
९. अपर मुख्य सचिव (वने) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32
१०. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. महालेखापाल, महाराष्ट्र-1/2 (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
१२. सर्व मंत्री यांचे स्वीय सहाय्यक
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, मेंढी फार्म, गोखले नगर, पुणे-411 016.
१५ सरकारी वकील, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई- 400 032.
१६. निवड नस्ती.

—०x०—